# वचनपूर्ती

सोनेगांव नावाचं एक शहरवजा गाव होतं. गावातील लोक आपापल्या दैनंदिन जीवनाला आवश्यक असणारे सामान बाजारओळीतूनच खरेदी करत असत. जगन्नाथपंत एक प्रतिष्ठीत व्यापारी होते त्यांचं दुकान इतकं प्रसिद्ध होतं की, बहुतेक सगळ्यांचच घरात त्यांच्याकडील सामान विकत घेतल्या जात असे. जगन्नाथ शेठ हे एक प्रसन्न व्यक्तिमत्व असणारे, गिऱ्हाईकांना देव मानणारे होते गावात त्यांचं बंगलेवजा घर होतं. जानकी त्यांची धर्मपत्नी, प्रिया आणि पियुष असे दोन गोंडस मुलं, यांच्यासह ते राहत होते. घरात नेहमी आनंदी वातावरण असायचे मुलांवर चांगले संस्कार होत होते सगळ्यांनाच त्यांच्या कुटुंबाचा अभिमान होता.

जगन्नाथशेठ त्यांना हवा असलेला माल मुंबईच्या मोठ्या मार्केटमधून आणित असत. त्यांचे ट्रकसुद्धा सामान ने-आण करण्यात तरबेज झाले होते. असेच आनंदात दिवस जात होते प्रिया १६ वर्षांची तर पियुष १० वर्षांचा होता. दोघेही अभ्यासात हुशार होतेच पण शाळेतील अवांतर स्पर्धांमध्येही भाग घेऊन नांव कमावित होते. जानकीबाई तर आल्या गेल्या प्रत्येकाला नेहमीच मदत करायच्या.

सणांचे दिवस होते. नेहमीप्रमाणे ट्रक मुंबईहून निघाले, यावर्षीस सामानही जरा जास्त होतं. नियतीच्या मनात काही वेगळंच होतं. रस्त्याने येत असतांना ट्रकचा मोठा अपघात झाला. त्या ट्रकच्या मागे दुसराही ट्रक होता त्यालाही जोरदार धडक बसली. आणि त्या अपघातात सगळ्या सामानाचं नुकसान झालं. दोन्ही ट्रक ड्रायव्हर आणि त्यांचे दोन मदतनीस दवाखान्यात नेत असतांनाच हे जग सोडून गेले. बातमी कळताच जगन्नाथपंत घाबरून गेले, आयुष्यात पहिला कठिण प्रसंग ओढवला, त्याला कसे सामोरे जायचे?? आर्थिक नुकसान तर झालेच, पण त्यांच्याकडे काम करणाऱ्या चौघांचा मृत्यू झाला. हा आघात ते सहन करु शकले नाही, आणि त्यातच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

सगळेच अर्धवट राहयाले, जानकीबाईंनी कसातरी धीर धरला होता. होते नव्हते तेवढे पैसे लावून गेलेल्या लोकांच्या कुटुंबाला मदत केली. सावकाराचे पैसे द्यायचे होते तर राहतं घरही विकावं लागलं. अगदी होत्याचं नव्हतं झालं. आयुष्याचा जोडीदार गेला, जमीनजुमला, घर, दुकान सगळं सगळं गेलं. त्यांना

जवळचे नातलग म्हणजे फक्त जगन्नाथपंतांचे काका होते. ते कोकणात राहायचे. जानकीबाई दोन्ही मुलांसह त्यांच्याकडे राहायला आल्या. काकांच्या घरच्या मंडळींना त्या इथे आलेल्या फारसं आवडलं नव्हतं पण काकांचाच हुकूम म्हटल्यावर काकू काही करु शकत नव्हत्या. परंतु घरकामात जानकीबाईंना खूप काम करायला लावायच्या. मुलं बिचारी अंतरून गेली. फुलांप्रमाणे आयुष्य जगणाऱ्यांच्या नशिबात दुःखाचे, संकटांचे काटे बोचू लागले. पियुष तर लहानच. कधी तो दुधासाठी हट्ट करी, तर कधी जेवणात गोड हवं म्हणून हट्ट करी. प्रिया त्याला समजावून सांगत असे. पण तिलाही खूप वाईट वाटायचे. तिचे दहावीपर्यंत शिक्षण झालं होतं. पुढे शिकायची इच्छा होती पण परिस्थितीमुळे तिला घरीच बसावं लागलं. पियुष शाळेत जात होता. असा त्रास सहन करत करत २।३ वर्षे झाली. प्रियाचे १८ वर्षे वय म्हणजे लग्नाचे झाले. काकाआजोबाही आता थकले होते. त्यांच्यासमोर लग्न झालं तर बरं नाहीतर काकूंच्या ताब्यात प्रियाचं आयुष्य आणखी कठीण होईल. या विचाराने जानकीबाई तिच्या लग्नासाठी तयार झाल्या.

काकांनी एक ठिकाण सुचवलं. मुलगा दिसायला खूप चांगला नव्हता काळा, तोंडावर देवीचे वण, आणि थोराड असा होता. तो त्याच्या आई व बहिणीसोबत राहत होता. बहिणीचे लग्न ठरलेच होते. म्हणून आई आता त्याच्या लग्नासाठी मागे लागली होती. तिघांचं कुटुंब, खाऊन-पिऊन सुखी होतं. काकांनी प्रियाबद्दल विचारलं, दाखवण्याचा कार्यक्रम पार पडला, २।३ दिवसांनी सांगतो असं म्हणून त्यांनी निरोप घेतला, प्रकाशला प्रिया आवडली होती पण त्याला वाटलं ती आपल्या योग्यतेची नाही. पण आईने समजूत घातल्यावर त्यांनी काकांना होकार कळवला. होकार आल्यावर प्रियाने एकदा मला मुलाशी बोलायचे आहे असे म्हटल्यावर काकूंची इच्छा नव्हती पण काकांनी पुढाकार घेवून दोघांची भेट घडवून आणली.

प्रिया जेव्हा प्रकाशला भेटली तेव्हा सरळ मुद्यावरच येवून बोलु लागली. ती म्हणाली मी तुमच्याशी लग्न करायला तयार आहे पण माझी एक अट आहे. लग्नानंतर माझ्या आईची व भावाची जबाबदारी तुम्हाला घ्यावी लागेल. भावाचं शिक्षण, नोकरी, लग्न सगळं नीट पार पडलं पाहिजे. आईने आजवर खूप कष्ट केले.

तिला कष्टांची सवय नव्हती तशी आमच्यासाठी म्हणून ती आलेल्या प्रसंगाला सामोरी जात होती. माझं शिक्षण मध्येच सोडावं लागलं, त्यामुळे तिला सांभाळण्याची जबाबदारी मी पार पाडू शकलो नाही. म्हणून लग्नानंतर माझ्या पत्नीने जर हे उत्तरदायित्व स्विकारले तरच त्यांचे जीवन मार्गी लागेल. बघा तुम्हाला पटत असेल तरच हे लग्न होईल ----

प्रकाश संयमी होता. लहानपणी देवीच्या साथीमुळे त्याचा चेहरा विद्रुप झाला होता. पण मेहनत आणि हुशारी या गुणांमुळे जीवनात त्याने चांगला जम बसवला. आता बहिण सासरी गेल्यावर घर सूने सूने होईल म्हणून प्रकाशच्या लग्नाचा घाट आईने घातला. आणि नेमके तेव्हाच काकासाहेबांनी प्रियाच्या स्थळाबद्दल विचारलं. प्रिया दिसायला सुंदर होती, शिवाय आपले म्हणणे मुद्देसुदपणे मांडण्याचे तिचे कौशल्य त्याला आवडले. थोडा विचार करून त्याने तिला शब्द दिला की, लग्नानंतर तो तिच्या आईची व भावाची योग्य प्रकारे आपलेपणाने काळजी घेईल. त्याचा शब्द म्हणजे जणू काही वचनच मिळाल्याचा प्रियाला आनंद झाला आणि तिने लग्नासाठी होकार दिला.

ठरल्याप्रमाणे लग्न व्यवस्थित पार पडले. प्रकाश आपल्या दिलेल्या शब्दाला बरोबर जागला. त्याने पियुषला १०वी नंतर शहरात शिकायला पाठवले. होस्टेलमध्ये त्याची सोय केली. पियुष हुशार होताच, परिस्थितीची त्याला जाणीवही होती. तो मनापासून अभ्यास करु लागला. प्रियाची आई काकांकडेच राहु लागली पण प्रकाश जावई म्हणून हक्काने त्यांच्या तब्येतीकडे लक्ष देत असे. त्यांना थोडा बदल व्हावा म्हणून एका ट्रॅव्हल कंपनीसोबत आपल्या आईसोबत चारधाम यात्रेला पाठवले.

प्रकाश-प्रियाचा संसार आनंदात सुरु होता. त्यांच्या संसारवेलीवर 'प्रज्ञा' नावाची गोड कळी उमलली होती. असं सगळं आनंदात सुरु असतांना काका आजोबांचे वार्धक्यामुळे निधन झाले, काकू आता परिस्थितीमुळे मवाळ झाली होती. जानकीचाच तिला आधार वाटू लागला होता. कारण मुलं शेतीची, जमिनीची, आणि घराची वाटणी मागु लागले, आपापसात वैऱ्यासारखे भांडू लागले होते. मुलं पैसा कमवण्यासाठी काहीच काम करीत नव्हते, घरातील गंगाजळी

किती दिवस पुरणार होती ?? त्यांची आर्थिक परिस्थिती खालावत चालली होती,

प्रकाशला सगळी परीस्थिती दिसत होती, आता पियुष इंजीनिअर झाला त्याला पुढील शिक्षणासाठी प्रकाशने परदेशी पाठवले. जानकीबाईंना स्वतःच्या घरी राहायला बोलावले. मागचं सगळं विसरून काकूंनाही मदत केली. काकू आता खरंच परावलंबी झाल्या होत्या; जानकीला व मुलांना आपण किती छळलं याची आठवण होऊन त्यांना पश्चात्ताप होत होता. प्रिया स्वभावाने हळवी असल्यामुळे तिने काकूंशीही संबंध चांगले ठेवले. आपले कर्तव्य बजावत राहिली.

प्रकाशच्या सत्कार्यामुळेच तिला आजचे हे आनंदाचे क्षण उपभोगायला मिळत होते; त्याबद्दल तिला कृतज्ञता वाटत होती. त्याचा सार्थ अभिमानही वाटत होता. आपल्याला दिलेला शब्द प्रकाशने बरोबर पाळला याचे कौतुक तिला आणि जानकीबाईंना होतेच, पण पियुषला सुद्धा आपले 'जीजाजी' म्हणजे जणू काही 'मित्रच' आहे, असे वाटायचे. या सगळ्यांच्या स्नेहबंधाने प्रेम हळूहळू मोठे होत होते. तिला पियुषमामासारखं हुशार व्हायचं होतं; खूप खूप शिकायचं होतं;

म्हणजे काय तर प्रकाशच्या सच्चेपणामुळे शेवट गोड झाला याचा सर्वांना आनंद झाला !!

शब्दांकन :- सौ विजया जोशी.

विष्णू रामचंद्र उपाध्ये





श्री. प्रकाश देशपांडे